# अल्पवयीन बालीकेसोबत लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. भिवापुर** :— अल्पवयीन फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भिवापुर येथे अप क्र. ३०२/२२ कलम ३७६,३७६(२)(जे),(एन),३७६(३),५०६भादंवि सहकलम ४,६,८ पोक्सोकायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर घटना दिनांक डिसेंबर २०२१ ते जानेवारी २०२२ पर्यंत घडली आहे. यातील अल्पवयीन फिर्यादी ही आपले घरी एकटी असतांना नमुद गुन्हयातील आरोपी नामे **अविनाश एकनाथ मांढरे, वय २२ वर्षे, रा. कारगाव ता. भिवापुर जि. नागपुर** याने पिडीतेला एक काम सांगतो तु माझे घरी ये असे म्हणुन पिडीतेला आपल्या घरी बोलावुन पिडीता ही अल्पवयीन आहे हे माहीती असतांनातिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर सुध्दा आरोपीने २ ते ३ वेळा पिडीतेला घरी बोलावुन पिडीतेसोबत लैगिक अत्याचार केला त्यामुळे पिडीता गर्भवती झाली आणि तिला मुलगी झाली. अशा पिडीतेच्या तोडी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद झाला होता.

सदर प्रकरणाचे तपास**सहा.पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे नेम. उमरेड पोलीस स्टेशन कॅम्प पोलीस स्टेशन भिवापुर**यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात**मा.एक्स्ट्रा डी.जे. श्री एस.ए.श्रीखंडे** यांनी दिनांक **०९/०४/२०२५ रोजी**आरोपी नामे **अविनाश एकनाथ मांढरे, वय २२ वर्षे, रा. कारगाव ता. भिवापुर जि. नागपुरयाला सदर गुन्हयात कलम ३७६(३) भादंवि मध्ये २० वर्षे सश्रम कारावास व १०,०००/—रू दंड,दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास २) कलम ५०६ भादवि मध्ये ०२ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने **एपीपीश्रीमती व्ही.डब्ल्यु.बालपांडे** यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन**श्रेणीपोलीस उपनिरीक्षक तुलाराम खडसे पो.स्टे.भिवापुर** यांनी मदत केली आहे.